# कार्यकारी गोषवारा

# 2017 ची केस क्रमांक: 139

**महाराष्ट्र वीज नियामक आयोगासमोर**

**2017 ची केस क्रमांक: 139**

१. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

२. रिलायन्स इलेक्ट्रिक जनरेशन ॲण्ड सप्लाय लिमिटेड .. याचिकाकर्ता

विरूद्ध

अदानी ट्रान्समिशन लिमिटेड .. प्रतिवादी

१. प्रथम याचिकाकर्ता इतर गोष्टींबरोबरच वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण यांचा व्यवसाय करतात. १ले याचिकाकर्ता हे ईपीसी पद्धतीने वीज निर्मिती प्लॅन्ट उभारण्याचे काम करतात. १ले याचिकाकर्ता वीजेशी संबंधित नसलेले इतर व्यवसाय देखील करतात जसे मेट्रो रेल्वे, रस्ते वगैरे सारख्या पायाभूत प्रकल्पांचा विकास, अंमलबजावणी आणि कार्यान्वितीकरण.

२. १ले याचिकाकर्ता हे परवानाधारक असून त्यांना इलेक्ट्रिसिटी कायदा, २००३ (ईए०३ संक्षिप्त स्वरूपात) मधील कलम १४ मधील तरतुदींच्या अंतर्गत वीज पारेषण परवाना देण्यात आला आहे.

३. २रे याचिकाकर्ता हे रिलायन्स इलेक्ट्रिक जनरेशन ॲण्ड सप्लाय लिमिटेड असून, ही १ले याचिकाकर्ता यांच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी असून, कंपनी कायदा, १९५६ मधील तरतुदींच्या अंतर्गत ह्या कंपनीची स्थापना आणि नोंदणी करण्यात आली आहे आणि ती कंपनी कायदा, २०१३ मधील तरतुदींच्या अंतर्गत विद्यमान कंपनी आहे.

४. १ले याचिकाकर्ता यांना देण्यात आलेला पारेषण परवाना २रे याचिकाकर्ता यांना स्वाधीन करण्यासाठी आणि १ले याचिकाकर्ता यांच्या मालमत्तेसह पारेषण युटिलिटीच्या हस्तांतरणास इतर गोष्टीबरोबरच माननीय आयोगाची मंजुरी मिळविण्यासाठी ईए०३ मधील कलम १७(३) मधील तरतुदींच्या अंतर्गत सदर याचिका दाखल करण्यात येत आहे.

५. १ले याचिकाकर्ता आणि २रे याचिकाकर्ता आणि त्यांचे संबंधित भागधारक आणि क्रेडिटर्स (संक्षिप्त स्वरूपात ''योजना'') यांच्यातील योजनेनुसार, येथे वर नमूद करण्यात आलेल्या १ले याचिकाकर्ता यांच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या २रे याचिकाकर्ता यांना वीजेशी संबंधित सर्व व्यवसाय हस्तांतरित करण्याचा १ले याचिकाकर्ता यांचा प्रस्ताव आहे.

६. सदर योजना नेमणुकीच्या तारखेपासून किंवा मुंबई उच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या इतर कोणत्याही तारखेपासून अंमलात येईल आणि येथे निश्चित करण्यात आलेल्या प्रभावी तारखेपासून कार्यान्वित होईल.

७. नेमणुकीच्या तारखेपासून, १ले याचिकाकर्ता यांचा संपूर्ण व्यवसाय आणि वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण विभागाची संपूर्ण मालमत्ता कंपनी कायदा, १९५६ मधील किंवा कंपनी कायदा, २०१३ मधील लागू तरतुदींनुसार, लागू असेल त्याप्रमाणे आणि कोणताही अधिक कायदा, करार, विषय किंवा इतर बाबी शिवाय, वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण विभागाशी संबंधित सर्व अधिकार, शीर्षक, आणि स्वारस्य २रे याचिकाकर्ता यांना देण्यासाठी त्यांचे नावे हस्तांतरित व प्रस्थापति होतील आणि निहित होतील आणि/किंवा हस्तांतरित झाले व प्रस्थापति झाले असे समजण्यात येईल.

८. नेमणुकीच्या तारखेपासून, वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण विभागाशी संबंधित १ले याचिकाकर्ता यांचे सर्व राखीव निधी, कर्जे, दायित्व, आनुषंगिक दायित्व, कर आणि सर्व प्रकारच्या, स्वरूपाच्या आणि तपशिलवार जबाबदाऱ्या देखील कंपनी कायदा, १९५६ मधील तरतुदींच्या अंतर्गत आणि सर्व इतर लागू तरतुदी, काही असल्यास, कंपनी कायदा, २०१३ मधील लागू तरतुदींच्या अंतर्गत, आणि कोणताही अधिक कायदा किंवा करार, २रे याचिकाकर्ता यांना हस्तांतरित करण्यात येतील, जेणेकरून नेमणूकीच्या तारखेपासून सर्व राखीव निधी, कर्जे, दायित्व, आनुषंगिक दायित्व, कर आणि जबाबदाऱ्या २रे याचिकाकर्ता यांच्या होतील आणि ह्या उपकलमाची कार्यवाही करण्यासाठी सदर राखीव निधी, कर्जे, दायित्व, आनुषंगिक दायित्व, कर आणि जबाबदाऱ्या ज्यामुळे निर्माण झाल्या आहेत अशा कोणत्याही कंत्राट किंवा व्यवस्थेचे पक्षकार असलेल्या इतर कोणाही तिसऱ्या पक्षाची किवा इतर व्यक्तीची संमती मिळविण्याची आवश्यकता नसेल.

९. नेमणुकीच्या तारखेपासून आणि योजना कार्यान्वित झाल्यापासून, वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण विभागाचे कामकाज करण्यासाठी आवश्यक असलेले १ले याचिकाकर्ता यांच्यापाशी असलेले सर्व वैधानिक परवाने, परवानग्या किंवा मंजुऱ्या अथवा संमत्या कोणतेही अधिक कार्यवाही किंवा कराराशिवाय २रे याचिकाकर्ता यांच्या स्वाधीन होतील किंवा हस्तांतरित होतील आणि संबंधित वैधानिक प्राधिकारी २रे याचिकाकर्ता यांचे नावे त्यात योग्य तो बदल करतील

आणि सर्व वैधानिक आणि नियामक परवानग्या, पर्यावरणासंबंधी मंजुऱ्या आणि संमत्या, नोंदण्या किंवा इतर परवाने, आणि संमत्या यांचे सर्व लाभ, त्यांनी मूळरित्या मिळविल्या होत्या अशा प्रकारे, २रे याचिकाकर्ता यांच्या स्वाधीन होतील किंवा हस्तांतरित होतील. सरकारी मंडळे, स्थानिक प्राधिकारी किंवा इतर कोणीही व्यक्ती यांनी वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण विभागाशी संबंधित दिलेल्या किंवा १ले याचिकाकर्ता यांना मिळणाऱ्या विविध प्रकारच्या सवलती, अनुदान, पुनर्वसन योजना, विशेष दर्जा आणि इतर लाभ किंवा विशेषाधिकारांचा लाभ, १ले याचिकाकर्ता यांना ज्या नियम व अटींनुसार उपलब्ध होते त्यानुसार २रे याचिकाकर्ता यांच्या स्वाधीन होतील किंवा हस्तांतरित होतील, जणूकाही ते २रे याचिकाकर्ता यांना वाटपकरण्यात आल्या होत्या आणि/किंवा प्रदान करण्यात आल्या होत्या आणि/किंवा मंजूर करण्यात आल्या होत्या आणि/किंवा परवानगी देण्यात आली होती.

१०. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने २०१६ ची कंपनी योजना याचिका क्र.४४० आणि ४४१ अंतर्गत आपल्या दिनांक १९.०१.२०१७च्या निकालाद्वारे आणि आदेशाद्वारे ह्या योजनेच्या व्यवस्थेला मंजुरी दिली आहे.

११. ही योजना खास करून, इतर गोष्टी बरोबरच, तरतूद करते की माननीय आयोगाच्या अटी व मंजुरीच्या अधीन राहुन ही योजना आहे व असेल.

१२. असे सादर करण्यात आले आहे की ही योजना  वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसाय अधिक प्रभावी व कार्यक्षम पद्धतीने चालविता यावे ह्या दृष्टीकोनातून सादर करण्यात आली आहे.

१३. विद्यमान याचिका प्रलंबित असताना, माननीय आयोगाच्या नियमनातील संघटित मुंबई पॉवर डिव्हिजन म्हणजे मुंबई वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण व्यवसायाच्या संदर्भातील याचिका दाखल करण्यात आल्यानंतर झालेल्या नंतरच्या घडामोडींची नोंद घेण्यासाठी याचिकेचे परिशिष्ट सादर करण्यात आले.

१३.१. १ले आणि २रे याचिकाकर्ता यांनी व्यवस्थेची योजना तयार केली असून त्या अन्वये २रे याचिकाकर्ता १ले याचिकाकर्ता यांचेकडून व्यवस्थेच्या योजनेअंतर्गत मुंबई पॉवर डिव्हिजन ताब्यात घेतील.

सादर करण्यात येत आहे की, सदर मुंबई पॉवर डिव्हिजनचे २रे याचिकाकर्ता यांना मुंबई पॉवर डिव्हिजनचे हस्तांतरण करण्यात आल्यानंतर,

याचिकाकर्ता आणि प्रतिवादी यांच्यातील दिनांक २१.१२.२०१७ च्या समभाग खरेदी कराराच्या (''एसपीए'') अटींनुसार आणि त्या अटींच्या अधीन राहून १ले याचिकाकर्ता यांनी प्रतिवादी यांना समभागांची विक्री करण्याचे आणि प्रतिवादी यांनी याचिकाकर्ता यांचेकडून  खरेदी करण्याचे मान्य केले आहे.

१३.२ २०११ चा पारेषण परवाना क्रमांक १ मधील परिच्छेद ५.२ नुसार, पारेषण परवानाधारक यांनी माननीय आयोगाला पारेषण परवानाधारक यांच्या मोठे समभाग धारणे मध्ये कोणतेही बदल झाल्यास त्याची माहिती कळविली पाहिजे. तरीही, याचिकाकर्ता माननीय आयोगाशी त्यांच्या मंजुरीसाठी आणि प्रतिवादीला सदर समभागांच्या हस्तांतरणाची माहिती कळविण्यासाठी संपर्क साधीत आहे.

१४. माननीय उच्च न्यायालयाने मंजूर केलेल्या योजनेच्या व्यवस्थेअंतर्गत, मालमत्तेसह युटिलिटी आणि नेमणुकीच्या तारखेला असलेला मुंबई पॉवर डिव्हिजनच्या संदर्भातील १ले याचिकाकर्ता यांचा परवाना, (उच्च न्यायालयाच्या आदेशात नमुद केल्याप्रमाणे), २रे याचिकाकर्ता यांना हस्तांतरित होईल आणि चालविले जाईल. वर नमूद केल्याप्रमाणे,

२रे याचिकाकर्ता यांचे समभाग त्यानंतर प्रतिवादी यांना हस्तांतरित होतील. त्यामुळे सादर करण्यात येत आहे की, वरील परवान्यांतर्गत कोणत्याही कायदेशिर कार्यवाहीच्या संदर्भात किंवा नियामक कार्यवाहीच्या संदर्भात ज्यांची प्रक्रिया सुरू आहे अशा नेमणुकीच्या तारखेपर्यंतच्या व्यवसायाशी संबंधित सर्व बाबी (दावे आणि दायित्वांसह) किंवा सरकारी संस्थेकडे बाकी असलेल्या विविध खर्च आणि/किंवा नामजूर आणि/किंवा दायित्व आणि/किंवा मागण्या आणि/किंवा येणी जी सर्व २रे याचिकाकर्ता यांना परवाना नेमून देण्याच्या अगोदरच्या कालावधीतील असतील ती १ले याचिकाकर्ता यांनी राखून ठेवली आहेत आणि त्यांच्या मालकीची आणि उपार्जित आहेत असे समजण्यात येईल. २रे याचिकाकर्ता यांना परवाना नेमून देण्यापुर्वीच्या कालावधीच्या संदर्भातील ग्राहकांकडून येणे बाकी असलेल्या सर्व रकमा आणि त्यांना देय असलेल्या रकमा जेव्हा देय किंवा वसूल होतील तेव्हा त्या १ला याचिकाकर्ता यांच्या नावे असतील. २रे याचिकाकर्ता यांनी ग्राहकांकडून येणे बाकी असलेल्या आणि वसूल केलेल्या सर्व सदर रकमा २रे याचिकाकर्ता यांनी ग्राहकांना देणी असलेल्या रकमा वळत्या केल्यानंतर त्या १ले याचिकाकर्ता यांना त्यानुसार देण्यात /हस्तांतरित करण्यात येतील.

१५. **विनंती अर्ज**

याचिकाकर्ता म्हणून विनंती करतो की, ह्या माननीय आयोगाने, कृपा करावी:

ए. माननीय उच्च न्यायालयाने दिनांक १९.०१.२०१७ रोजी २०१६ ची कंपनी योजना याचिका क्रमांक ४४० आणि ४४१ अंतर्गत मंजूर केल्यानुसार १ले याचिकाकर्ता यांचेकडून २रे याचिकाकर्ता यांना मालमत्तेच्या हस्तांतरणासह पारेषण युटिलिटीचे हस्तांतरण करण्यास मंजुरी द्यावी आणि योग्य खंडपीठाने त्यानुसार सदर पुढील आदेश मंजूर करावेत, आणि

बी. १ले याचिकाकर्ता यांचा २०११ चा पारेषण परवाना क्रमांक १, २रे याचिकाकर्ता यांचे नावे नेमून देण्यास मंजुरी द्यावी;

सी. २रे याचिकाकर्ता यांच्यातील १ले याचिकाकर्ता यांची १००% समभागधारणा प्रतिवादी यांचेकडे हस्तांतरित करण्यास मंजुरी द्यावी;

डी. परवान्यांतर्गत व्यवसायाच्या संदर्भात मागील दाव्यांच्या संदर्भात येणी किंवा देणी निर्माण झाल्यावर, सदर सर्व रकमा १ले याचिकाकर्ता २रे याचिकाकर्ता यांचेकडून स्वीकारण्यास पात्र असतील आणि २रे याचिकाकर्ता यांना देणे असतील.

ई. केसचे स्वरूप आणि परिस्थितीनुसार आवश्यकते प्रमाणे आधिक सर्व आणि इतर मदत.